ePaper
न्याय व्यवस्था ही आदर्श असायला हवी, ती ईडीच्या हातात जायला नको – शरद पवार
| वर्ष - 8 | अंक - 283 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- विराटला इंग्लंडमध्ये खेळण्याची ऑफर?
- आरसीबीला सामना रद्द झाल्याचा धक्का
- यामुळे आपण किती विमाने गमावली?
- पाकिस्ताविरोधात ओवेसी रोखठोक


www.mahaenews.com | रविवार, दि. 18 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### भारताने पाकिस्तानकडे सादर केली खतरनाक दहशतवाद्यांची यादी..

# भारताच्या 'हिट-लिस्ट' वर, मोस्ट वॉन्टेड दहशतवादी!

### कुख्यात दहशतवाद्यांना पाकिस्तानात त्यांच्या लष्कराचे संरक्षण : जागतिक दबाव आणला तरीही...

| नवी दिल्ली / इस्लामाबाद
| प्रतिनिधी | महाईन्यूज




### पाकड्यांचा प्रचंड पुळका नडणार.. चिनीमालावर बंदी घालण्याशिवाय पर्याय दिसत नाही !

**दहशतवादी कारवायांमुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये प्रचंड तणाव असून भारताने पाकिस्तानने आश्रय दिलेल्या 'मोस्ट वॉन्टेड' दहशतवाद्यांची आणि त्यांच्या ठावठिकाण्यांची यादीच पाकिस्तानला सादर केली आहे. पाकिस्तानने हे खतरनाक दहशतवादी त्वरित भारताच्या ताब्यात द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. पाकिस्तानच्या दुष्काळाच्या संरक्षणाखाली हे सर्व दहशतवादी वेगवेगळ्या शहरांमध्ये आरामाचे जीवन जगत आहेत.**

### तोपर्यंत शांतता आणि चर्चा शक्य नाही!

भारताने पाकिस्तानला स्पष्ट शब्दात ठणकावले आहे, की या जहाल दहशतवाद्यांना पाकिस्तानने आश्रय दिला असल्यामुळे आणि त्यांच्याभोवती संरक्षणाचे कडे असल्यामुळे त्यांच्या भारतविरोधी कारवाया सुरू आहेत. या कारवाया ताबडतोब बंद व्हाव्यात, यासाठीच या दहशतवाद्यांना भारताच्या ताब्यात देण्यात यावे. भारतात त्यांनी केलेले हिंसाचाराची मोठी यादी ही भारताने सादर केली आहे.

### दहशतवाद प्रशिक्षण केंद्रे उद्ध्वस्त..

दहशतवाद्यांच्या विरोधात भारताने नुकतीच 'ऑपरेशन सिंदूर' ही कारवाई केली. त्यामध्ये दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे उद्ध्वस्त करण्यात आली. उद्ध्वस्त करण्यात आलेल्या या केंद्रांची संख्या नऊ होती. यातील बरीचशी पाकव्याप्त काश्मीर आणि काही पाकिस्तानच्या गजबजलेल्या शहरांमध्ये होती. पाकिस्तानने सादर केलेल्या आकडेवारीत या कारवाईमध्ये सुमारे दीडशे दहशतवादी ठार झाले आहेत. भारताचे ते मोठे यश आहे, असे लष्करांकडून सांगितले जाते.

### दहशतवाद्यांचे म्होरके मोकाट आणि सुसाट..

भारताने मागणी केलेल्या प्रमुख म्होरक्यांमध्ये लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-महम्मद आणि हिजबुल मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनांच्या म्होरक्यांचा समावेश आहे. त्यामध्ये कुख्यात हाफिज सईद, मसूद अझहर, दाऊद इब्राहिम आणि इतर दहशतवादी समाविष्ट आहेत.

### पाकिस्तानच्या लष्कराचे संरक्षण..

हे सर्व दहशतवादी आणि त्यांचे म्होरके पाकिस्तानात मोकाट फिरत आहेत. त्या सर्वांना पाकिस्तानच्या लष्कराचे संरक्षण आहे. त्यांना भारताच्या ताब्यात देण्याची मागणी पाकिस्तानला करण्यात आली आहे.

### भारताविरुद्धच्या कटात नेहमी सहभाग..

हाफिज सईद हा २००८ च्या मुंबई हल्ल्याचा सूत्रधार आहे आणि तो लष्कर-ए-तोयबाचा प्रमुख आहे तर मसूद अझहर हा जैश-ए-महम्मदचा प्रमुख आहे. पुलवामा आणि इतर हल्ल्यांशी त्याचा संबंध आहे. कुख्यात डॉन दाऊद इब्राहिम हा तर १९९३ चे मुंबई बॉम्बस्फोट आणि इतर गुन्ह्यांसाठी भारताला हवा आहे. या व्यक्तिरिक्त आणखी कित्येक जहाल दहशतवादीदेखील पाकिस्तानात उघडपणे संरक्षणाखाली फिरत आहेत.

### विश्वसनीयता सिद्ध करायची? मग दहशतवादी द्या !

पाकिस्तानकडून होणारा सीमापार दहशतवाद थांबेपर्यंत पाणी मिळणार नाही, हे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचे विधान कठोर भूमिका दर्शवते. भारतातून वाहत जाणाऱ्या सहा नद्यांचे पाणी मिळायचे बंद झाल्यानंतर पाकिस्तानचे डोळे उघडतील, असे जयशंकर यांचे म्हणणे आहे. पाकिस्तानने त्यांची विश्वसनीयता सिद्ध करण्यासाठी काही दहशतवाद्यांचे प्रत्यार्पण करावे, असा आग्रह भारत सतत करत आहे. भारतीय एजन्सी इंटरपोलद्वारे रेड-कॉर्नर नोटीशीचा पाठपुरावा करत आहेत.

### पाकिस्तान ही तर दहशतवाद निर्मितीची फॅक्टरी !

जगातील बहुतेक मुस्लिम राष्ट्रांनी आता पाकिस्तानला वाळीत टाकण्याचे धोरण स्वीकारले आहे. पाकिस्तान ही दहशतवाद निर्मितीची फॅक्टरी बनली आहे, असा दावा अनेक मुस्लिम राष्ट्रांनी केला आहे. हे सर्व दहशतवादी मोकाटपणे पाकिस्तानात फिरतात, त्यांना लष्कराचे संरक्षण असते आणि अन्य राष्ट्रांविरुद्ध कट कारस्थाने करणे आणि ती पार पाडणे तसेच हिंसाचार घडवून आणणे यासाठी त्यांचा वापर करून घेतला जातो. दहशतवादी आणि पाकिस्तानचे लष्कर यांच्यात किती जवळचे संबंध आहेत, हे भारताने ठार केलेल्या दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी दिसून आले. पाकिस्तानी लष्कराचे अनेक ज्येष्ठ अधिकारी त्यावेळी उपस्थित होते. अनेकांना अश्रू आवरता आले नाहीत, हे देखील अवघ्या जगाने पाहिले आहे.

### आंतरराष्ट्रीय दहशतवादी

पाकिस्तानने सांभाळलेल्या दहशतवाद्यांपैकी अनेक जण आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून कुख्यात आहेत. यापैकी बरेच जण संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केलेले जागतिक दहशतवादी आहेत. वेगवेगळे स्फोट आणि हिंसाचारात त्यांच्या सहभागाचे पुरावे असलेली अनेक कागदपत्रे अनेकवेळा पाकिस्तानला सादर करण्यात आली आहेत. भारताने अनेक दहशतवाद्यांना जागतिक दहशतवादी म्हणून घोषित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या माध्यमाचा वापर केला आहे.

# 'देशात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सहकारी बँकांना आवाहन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'सायबर गुन्ह्यांत आतापर्यंत ७० हजार कोटींची फसवणूक झाली असून, सहकारी बँकांमधील ठेवीदारांच्या ठेवींच्या सुरक्षिततेसाठी संचालकांनी तातडीने सायबर सुरक्षा प्रणालीचा अवलंब करावा,' असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री अजित पवार यांनी शनिवारी केले.**



रामराज्य सहकारी बँकेच्या नव्या वास्तूच्या कोनशिलेचे अनावरण बिबवेवाडीतील सुप्रीम प्लाझा सोसायटीतील बँकेच्या प्रांगणात शनिवारी पवार यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार चेतन तुपे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, रामराज्य बँकेचे संस्थापक विजय मोहिते, विधिज्ञ सुभाष मोहिते, अध्यक्ष नंदा लोणकर, उपाध्यक्ष शिरीष मोहिते आदी उपस्थित होते.पवार म्हणाले, 'देशात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. राज्य, राष्ट्रीय, जिल्हा आणि तालुका पातळीवरील बँकिंग क्षेत्राला सायबर गुन्ह्यांमुळे ७० हजार कोटींचा फटका बसला आहे. सुरक्षिततेसाठी या बँकांनी सायबर सुरक्षात्मक प्रणाली विकसित केली आहे. त्याच धर्तीवर सहकारी बँकांसाठीही सायबर सुरक्षा प्रणाली तयार केली असून, अनेक सहकारी बँकांनी याचा अवलंब सुरू केला आहे. यातून ठेवीदारांच्या ठेवी, बँकांचे व्यवहार, गोपनीयता अबाधित राहील.''सहकार क्षेत्र आणखी लोकाभिमुख आणि पारदर्शक करण्यासाठी मोठे बदल करण्यात येणार आहेत. त्यासाठी राज्य स्तरावर स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीकडून अभ्यास करून स्वतंत्र नियमावली तयार करण्यात येणार आहे. अहवाल प्राप्त होताच येणाऱ्या विधिमंडळ अधिवेशनात त्याला मंजुरी देण्यात येईल,' असे पवार यांनी सांगितले.ते म्हणाले, 'सहकार क्षेत्राबद्दल लोकांमध्ये आपलेपणाची भावना रुजणे गरजेचे आहे. त्यामुळे संचालक मंडळाने राजकारण बाजूला ठेवून ठेवीदार आणि बँकेच्या हितार्थ काम करणे अपेक्षित आहे. काळानुरूप सहकार क्षेत्रातही नवीन बदल आवश्यक आहेत. ठेवीदारांचा विश्वास, पारदर्शक व्यवहार, सुरक्षित ठेवी आणि कामकाजाच्या इतर बाबींनुसार धोरणात्मक बदल करण्यात येतील.'रामराज्य सहकारी बँकेच्या नव्या वास्तूच्या कोनशिलेचे अनावरण बिबवेवाडीतील सुप्रीम प्लाझा सोसायटीतील बँकेच्या प्रांगणात शनिवारी पवार यांच्या हस्ते करण्यात आले.बँकेचे संस्थापक विजय मोहिते, विधिज्ञ सुभाष मोहिते, अध्यक्ष नंदा लोणकर, उपाध्यक्ष शिरीष मोहिते आदी उपस्थित होते.पवार म्हणाले, 'देशात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

### स्वतंत्र नियमावली तयार

सायबर गुन्ह्यांमुळे ७० हजार कोटींचा फटका बसला आहे. सुरक्षिततेसाठी या बँकांनी सायबर सुरक्षात्मक प्रणाली विकसित केली आहे. त्याच धर्तीवर सहकारी बँकांसाठीही सायबर सुरक्षा प्रणाली तयार केली असून, अनेक सहकारी बँकांनी याचा अवलंब सुरू केला आहे. यातून ठेवीदारांच्या ठेवी, बँकांचे व्यवहार, गोपनीयता अबाधित राहील.''सहकार क्षेत्र आणखी लोकाभिमुख आणि पारदर्शक करण्यासाठी मोठे बदल करण्यात येणार आहेत. त्यासाठी राज्य स्तरावर स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीकडून अभ्यास करून स्वतंत्र नियमावली तयार करण्यात येणार आहे. अहवाल प्राप्त होताच येणाऱ्या विधिमंडळ अधिवेशनात त्याला मंजुरी देण्यात येईल,' असे पवार यांनी सांगितले.

# अतिक्रमणांवर कारवाई करून पदपथ मोकळे

## महापालिकेच्यावतीने सुटीच्या दिवशीही कारवाई सुरु राहणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने शनिवारी नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता, तुळशीबाग, नरपतगिरी चौक, मॉडेल कॉलनी येथील दीप बंगला चौक येथे कारवाई करून अतिक्रमणे काढली. शहरातील विविध भागांतील रस्त्यांवर, पदपथांवर छोट्या मोठ्या व्यावसायिकांनी अतिक्रमणे करून दुकाने थाटली आहेत. राजकीय पक्षांच्या स्थानिक 'माननीयां'चा पाठिंबा असल्याने अगदी बिनधास्तपणे पदपथांवर व्यावसायिकांनी अतिक्रमण केल्याचे पाहायला मिळते.**




पदपथावर असलेल्या अतिक्रमणांमुळे नागरिकांना चालण्यासाठी रस्ता राहत नाही, अशा तक्रारी नागरिकांकडून केल्या जात होत्या. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीदेखील शहरात वाढत असलेल्या अतिक्रमणांबाबत नाराजी व्यक्त करून कारवाई करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला केल्या आहेत. नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावर शिवाजीनगर, घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने अतिक्रमण कारवाई करण्यात आली. अतिक्रमण निरीक्षक सचिन उतळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई झाली. प्रभाग क्रमांक १४, प्रभाग क्रमांक ७ व पुणे-मुंबई महामार्गावरदेखील कारवाई करून अनेक हातगाड्या आणि छोट्या व्यावसायिकांची दुकाने काढण्यात आली. दीप बंगला चौक, मंगळवार पेठ येथील जुना बाजार येथेदेखील कारवाई करण्यात आली. बाबू गेनू चौक व संपूर्ण तुळशीबाग परिसर येथे कारवाई करून अतिक्रमणे काढण्यात आली, अशी माहिती अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संदीप खलाटे यांनी दिली.शहरातील विविध भागांत महापालिकेच्या वतीने अतिक्रमण कारवाई सुरू आहे. सुटीच्या दिवशीही कारवाई सुरू राहणार आहे. शनिवारी नामदार गोपाळकृष्ण गोखले रस्ता, तुळशीबाग, मॉडेल कॉलनी येथे कारवाई करण्यात आली.पदपथावर असलेल्या अतिक्रमणांमुळे नागरिकांना चालण्यासाठी रस्ता राहत नाही, अशा तक्रारी नागरिकांकडून केल्या जात होत्या. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीदेखील शहरात वाढत असलेल्या अतिक्रमणांबाबत नाराजी व्यक्त करून कारवाई करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला केल्या आहेत.नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावर शिवाजीनगर, घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने अतिक्रमण कारवाई करण्यात आली. अतिक्रमण निरीक्षक सचिन उतळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई झाली. प्रभाग क्रमांक १४, प्रभाग क्रमांक ७ व पुणे-मुंबई महामार्गावरदेखील कारवाई करून अनेक हातगाड्या आणि छोट्या व्यावसायिकांची दुकाने काढण्यात आली.

### सुटीच्या दिवशीही कारवाई

दीप बंगला चौक, मंगळवार पेठ येथील जुना बाजार येथेदेखील कारवाई करण्यात आली. बाबू गेनू चौक व संपूर्ण तुळशीबाग परिसर येथे कारवाई करून अतिक्रमणे काढण्यात आली, अशी माहिती अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संदीप खलाटे यांनी दिली.शहरातील विविध भागांत महापालिकेच्या वतीने अतिक्रमण कारवाई सुरू आहे. सुटीच्या दिवशीही कारवाई सुरू राहणार आहे.

## पिंपरी चिंचवड महापालिकेची धडक कारवाई

# अखेर चिखलीतील 36 बंगल्यांवर हातोडा!

### चिखली येथील इंद्रायणी नदी लगतच्या निळ्या पूररेषेतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली येथील गट क्रमांक ९० मधील इंद्रायणी नदीलगतच्या निळ्या पूररेषेतील अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या ७ हजार २४५ चौरस मीटर भूभागावरील सुमारे ६३,९७० चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ३६ अनधिकृत बंगल्यांवर कारवाई करण्यात आली. या धडक कारवाईमुळे अनधिकृत बांधकाम धारकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.**



शहराच्या बाजूने जाणाऱ्या इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेमध्ये अनधिकृत पद्धतीने बांधण्यात आलेल्या बांधकामांवर कारवाई करण्याचा निर्णय हरित लवादने दिला होता. शिवाय हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. त्यास अनुसरून पिंपरी चिंचवड पालिकेच्या वतीने निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या चिखलीमधील या कारवाईमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपआयुक्त मनोज लोणकर यांच्या अधिपत्याखाली सहशहर अभियंता संजय खाबडे, नितीन देशमुख, उपआयुक्त राजेश आगळे,सीताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, अमित पंडित, श्रीकांत कोळप, किशोर ननवरे, शीतल वाकडे, पूजा दुधनाळे, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, महेश वाघमोडे, नाना मोरे, कार्यकारी अभियंता सुर्यकांत मोहिते, सुनील भागवानी, विजय सोनवणे, लक्ष्मीकांत कोल्हे, विजय वायकर, शिवराज वाडकर, सुनीलदत्त नरोटे



यांच्यासह उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपआयुक्त डॉ. शिवाजी पवार, बापूसाहेब बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त अनिल कोळी, राजेंद्रसिंह गौर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आयुक्त सिंह यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली तसेच कारवाईचा आढावा घेतला. सकाळी सहानंतर कारवाईला सुरुवात झाली. दुपारी साडेतीन वाजेला संपलेल्या या कारवाईमध्ये ३६ बंगल्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

मौजे चिखली येथील स.नं ९० पै. मधील इंद्रायणी नदी लगतच्या निळया पुररेषेतील उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत बांधकाम धारकांनी महापालिका प्रशासनाच्या विरोधात राष्ट्रीय हरीत लवाद पुणे यांच्याकडे दावा दाखल केला होता. २०२४ राष्ट्रीय हरीत लवादाच्या निकालाबाबत वादी यांचे मार्फत सर्वोच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्यात आला होता. सदर दाव्याबाबत राष्ट्रीय हरीत लवाद यांनी दिलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रकरणी 36 बंगल्यांवर कारवाई केली आहे.

#### निष्कासन कारवाईमध्ये यांचा सहभाग

अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ७ कार्यकारी अभियंते, २२ उपअभियंते, २२ कनिष्ठ अभियंते, २२ बीट निरीक्षक, १६८ महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, ४०० पोलीस आणि १२० मजूर कर्मचारी या कारवाईमध्ये सहभागी झाले होते. १५ पोकलेन, ३ जेसीबी यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय २ अग्निशमन वाहने आणि ४ रुग्णवाहिका याठिकाणी तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते.

" चिखली गट नंबर ९० मध्ये निळ्या पूररेषेत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे. नागरिकांनी पिंपरी चिंचवड शहरात घर, बंगला, जमीन खरेदी करताना अशा मालमत्तांच्या सर्व शासकीय परवानग्या तसेच आरक्षणे अथवा पुररेषेसारख्या तत्सम बाबी तपासून घेणे आवश्यक आहे. कोणीही अनधिकृतपणे बांधकाम करू नये. यापुढेही शहरातील अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेच्या वतीने कारवाईची मोहीम सुरू राहणार आहे.

**-शेखर सिंह,**
आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या अनुदानाला केंद्राची नकारघंटा

### 50 कोटींचे अनुदान रखडले; केंद्र सरकारची अनुदान देण्याची घोषणा कागदावरच

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने मोशीतील कचरा डेपोमध्ये वीजनिर्मिती प्रकल्प (वेस्ट टू एनर्जी) सुरू केला आहे. हा प्रकल्प सुरू होऊन पावणदोन वर्षांचा कालावधी झाला आहे. मात्र अद्याप प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून दिले जाणारे ५० कोटींचे अनुदान महापालिकेला मिळाले नाही. त्यामुळे केंद्र सरकारची अनुदान देण्याची घोषणा कागदावरच राहिली आहे.**






महापालिकेने सुरू केलेला 'वेस्ट टू एनर्जी' हा राज्यातील पहिलाच प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून दररोज सातशे टन सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लागत आहे. यातून दररोज १४ मेगावॅट वीज तयार करण्यात येत आहे. आत्तापर्यंत तब्बल २ लाख ५७ हजार ८१९ टन सुका कचरा जाळण्यात आला आहे. त्यापासून १३ कोटी ८२ लाख ४० हजार युनीट वीज निर्माण करण्यात आली आहे. यामुळे महापालिकेच्या वीज बिलात मोठी बचत होत आहे. कच-याची पर्यावरणपूरक पध्दतीने विल्हेवाट लागत आहे. त्यामुळे कचरामुक्तच्या दिशेने शहराची वाटचाल होत आहे. या प्रकल्पासाठी चिखली येथील सांडपाणी शुद्धीकरण केंद्राचे प्रक्रिया केलेले पाणी वापरले जाते. वापर झाल्यानंतर त्या पाण्यावर पुन्हा प्रक्रिया करून ते वापरात आणले जात आहे.

#### महापालिकेच्या वीजबिलात बचत

'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या माध्यमातून दररोज ७०० टन सुक्या कचऱ्यापासून १४ मेगावॅट वीज तयार करण्यात येत आहे. कचऱ्यापासून तयार करण्यात येणाऱ्या वीजेपैकी २ मेगावॅट वीज मोशी कचरा डेपो येथील वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी वापरण्यात येत आहे. तर उर्वरित १२ मेगावॅट वीज महापारेषण कंपनीस देण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका ती वीज निगडी, सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्र; तसेच शहरातील सांडपाणी शुद्धीकरण केंद्रासाठी वापरत आहे. ही वीज महापालिकेस ५ रुपये प्रतियुनिट दराने उपलब्ध होत आहे. त्यामुळे महापालिकेच्या वीजबिलात मोठी बचत होत आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### मी भगवंताचा आहे ही जाणीव ठेवावी.

आपल्याला काही हवे असे वाटले आणि ते तसे झाले नाही, म्हणजे तळमळ लागते. परंतु सर्व परमात्माच करतो आहे असे मानले, म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. आपण ‘ देव आहे’ असे म्हणतो, पण आपला तो खरा विश्वास आहे का ? एखादा मनुष्य बुडायला लागला, म्हणजे दगड जरी त्याच्या हाताला लागला तरी हा आपल्याला तारील असा त्याला विश्वास वाटतो, आणि तो त्याला धरून आपणही त्याच्या बरोबर बुडतो. म्हणून म्हणतो, ‘ देव आहे ’ असा आपला खरा विश्वास नसतो, आपण नुसते तोंडाने म्हणतो एवढेच ! नाही तर आपल्याला काळजी का वाटावी ? प्रत्यक्ष देव पुढे उभा राहिला तरी आपल्यामागची काळजी आणि सुखदु:खे संपणार नाहीत. याचे कारण म्हणजे, परमेश्वरावरचा आपला विश्वासच डळमळीत असतो. वास्तविक, परमेश्वराची इच्छा प्रमाण मानल्यावर सुखदु:ख मानण्याचे कारण नाही. परमेश्वर सर्वव्यापी आहे. तो जसा माझ्यात आहे, तसा दुसऱ्यातही आहे; म्हणून, दुसऱ्याने काहीही केले तरी आपल्याला त्याबद्दल काही वाटण्याचे कारण नाही. तरी अशी भावना ठेवून वागावे की, मी देवाचा आहे, तो माझा पाठीराखा आहे, आणि म्हणून काही झाले तरी मला काळजी करण्याचे कारण नाही. हे सर्व नामस्मरण केल्याने साधते. म्हणून, मी आजपासून सतत नामस्मरण करीत राहणार असा निश्चय करावा, आणि त्या दृष्टीने प्रयत्न चालू ठेवावा. परमेश्वराला शरण जाऊन ‘ मला तसे वागण्याची बुद्धी द्यावी’ म्हणून त्याची प्रार्थना करावी. मनाला पहिल्याने थोडी बळजबरी करावी लागेल. लहान मुलांना शाळेत जाण्याकरिता सुरुवातीला थोडी बळजबरी करावी लागते. मुलीला प्रथम सासरी पाठवितानाही तसेच करावे लागते. आपण थोडा तरी नियम करावा; उदाहरणार्थ, जेवायच्या आधी, रात्री निजताना, सकाळी उठताना, नाम घ्यायचेच; भगवंताची आठवण करायचीच. असे केले तर ते आयुष्यात फार उपयोगी पडेल. प्रपंचाचा प्रयत्न आज जो चालू आहे तसाच करीत जावा, पण ‘ मला भगवंत हवा ’ असे म्हणत जावे. मनामध्ये भगवंताची आस ठेवावी, म्हणजे ती हळू हळू वाढत जाईल, आणि तिचे पर्यवसान ध्यासामध्ये होईल. समजा, एखाद्या माणसाला घर बांधायचे आहे; ‘ मला घर बांधायचे आहे ’ असे तो म्हणत जातो, आणि त्यासाठी पैसे शिल्लक टाकतो. दागिने करायची वेळ आली तर ते नको म्हणतो, कारण पुढे घर बांधायचे आहे. हे जसे खरे, त्याचप्रमाणे ‘ भगवंत मला हवा ’ असे नुसते म्हणत गेल्याने देखील मनुष्य निव्वळ प्रपंचातच गुरफटून न जाता, विषय बेताने भोगेल. खरा ध्यास लागल्यावर, ती वस्तू मिळाल्यावाचून चैन पडणारच नाही.

बोधवचन:- ज्याचा भगवंतावर विश्वास, त्याला समाधान खास !

# रडतरौताची फेकाफेकी, पण,राजकारण ढवळलं !



‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक


**वाचक हो, आपल्याला माहीत आहे, की अनेकदा उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत म्हणजेच रडतरौत आणि त्यांची बेफाम वक्तव्ये हा आपल्या ‘संपादकीय’ मध्ये लिहिण्याचा विषय नाही असे सांगत आलो आहे. परंतु, गोबेल्सनीती नुसार एखादे मत वारंवार सांगितले, की ते खरे वाटायला लागते, त्यामुळे त्यातली सत्यता सांगण्यापेक्षा जे सांगितले जाते, ते कितपत योग्य आहे, हे पाहावे लागते. आता, हे सांगणे हा संजय राऊत यांच्याबाबत लिहिण्याचा विषय होतो. बाकी त्यांच्याबद्दल लिहावे, त्यांचे विचार खोडून काढावेत, इतके महान विचार अथवा त्यांच्या विचारांची योग्यता नाही.**

### पुस्तकात असणार फेकाफेकी..

सध्या ‘नरकातील स्वर्ग’ या त्यांच्या पुस्तक प्रकाशनाचे निमित्त आहे. ते हे निमित्त आपल्या फायद्याचे कसे होईल? याच्या जोडणीला लागले आहेत. राऊत तुरुंगात जाताना, त्यांनी जो माहोल निर्माण केला होता, तो एखाद्या युद्धाला जाणाऱ्या सरसेनापतीला निरोप देण्याच्या पद्धतीचा होता. घरातील बहुतेक कुटुंब सदस्य संजय राऊत यांच्या तुरुंगात जाण्याला देशभक्ती, देशप्रेम समजत होते. आठवते का, संजय राऊत भगवा गमचा हवेत फिरवत होते. त्यांचे बंधू सुनील राऊत हे तर भावविभोर झाले होते. त्यानंतर राऊत शंभर दिवस साधारणत तुरुंगात होते. तिथे त्यांना स्वर्ग दिसला. हा साक्षात्कार कोणालाही होत नाही, हे प्रथम लक्षात घ्या!

### शरद पवारांचा विश्वामित्री पवित्रा..

त्यामानाने राऊत खूपच भाग्यवान, दैवी सामर्थ्याचे म्हटले पाहिजेत. अशा परिस्थितीत त्यांनी ज्या प्रकारे हे पुस्तक लिहिले, ते त्यांचे कल्पनारंजन असण्याची शक्यता अधिक आहे. तुरुंगात राऊत यांना दैनंदिन लिखाणासाठी फार काही मुद्दे उपलब्ध असतील, घटना घडल्या असतील, असे नाही. त्यामुळे खयाली पुलाव आणि भूतकाळाची आठवण एवढीच दोन मनोरंजनाची साधने त्यांच्या जवळ होती. त्यातले भूतकाळ आणि खयाली पुलाव एकत्र करून शरद पवार यांना न विचारता त्यांनी हे पुस्तक काढले असावे. या पुस्तकाचे शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या हस्ते प्रकाशन आहे. त्यात शरद पवार पुस्तकातील त्यांच्या संबंधित घटनांबाबत विश्वामित्री पवित्रा घेत राऊत यांच्या खयाला पुलावाला कसे नाकारतील, हे दिसून आले आहे.



### नरेंद्र मोदी आणि शाहांचे किस्से !

पुस्तकात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबाबत लिखाण केले आहे. हे दोघे जेव्हा गुजरात दंगलीत आरोपी होते, तेव्हा स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे कसे आले होते.. बाळासाहेबांनीं मोदी यांना कसे पंतप्रधान केले? न्यायाधीशांना कसा फोन केला? किंवा शरद पवार यांनी कसा त्यांना जामीन मिळवून दिला, हे लिहिल्याचे माध्यमांमुळे समजत आहे. प्रत्यक्ष पुस्तक वाचायला मिळाले नाही. मात्र, या घटनांचे उल्लेख त्यात आहेत, असे राऊत मान्य करत आहेत. थोडक्यात, त्यांचे हे लिखाण ‘सनम गर हम डुबे, तो तुम्हे भी साथ लेके डुबेंगे।’ या धर्तीवर आहे, असे दिसते.

### मोदींची मदत अडचण ठरू शकते..

कायद्याच्या चौकटी बाहेर जाऊन शरद पवार यांनी नरेंद्र मोदी यांना मदत केली, हे विधान शरद पवार यांना अडचणीचे ठरू शकते. पवार आणि मोदी- शाहा यांच्या संबंधामुळे त्यांच्या राजकीय वाटचालीसाठी अडथळ्यांचे होऊ शकते. शरद पवार भाजपाबरोबर जाण्याच्या मन:स्थितीत आहेत . राऊत यांच्या या लिखाणामुळे पवार यांच्यावर अविश्वासाचा जो शिक्का आहे, तो अधिक गडद होण्याची शक्यता आहे.

### शरद पवारांना ब्रेक लावण्यासाठी?

कदाचित, शरद पवार यांनी भाजपा बरोबर जाण्याच्या हालचाली करु नयेत किंवा त्याला थोडा तरी ब्रेक लागावा, त्यांच्याबद्दल अविश्वास निर्माण व्हावा. यासाठीच असे लिखाण राऊतांनी केले असावे! बरं, अमित शाहा यांच्यासंदर्भात बाळासाहेब ठाकरे यांनी कोणत्या न्यायाधीशांना फोन केला, हे नैतिकतेमुळे सांगू शकत नाही, असे ते म्हणतात. पाह, किती बालिशपणा आहे. कोणत्या न्यायाधीशांसमोर शाहा यांची केस सुरु होती, हे आज सहज समजू शकते. त्यात नाव न सांगण्याचे काय मोठे नैतिकतेचे कौतुक? तुम्ही ही हिंदू आहात, हे बाळासाहेब यांचे न्यायाधीशांना उच्चारलेले वाक्य म्हणजे शिवसेना (उबाठा) कशी हिंदुत्ववादी आहे, हे हिदुत्वकार्ड खेळून सांगण्याचा प्रयत्न.. बरं, ते न्यायधीश आणि त्याच बरोबर शरद पवार हे पद स्वीकारताना जी शपथ घेतात, त्याचा भंग करतात. ही बाब आजही तेवढीच गंभीर आहे. बाळासाहेब आज हयात नाहीत.. असते तर ते ही अडचणीत आले असते. उद्धव ठाकरे यांची भूमिका महत्त्वाची आहे! पण, ते संजय राऊत यांना पाठीशी घालण्याची शक्यता जास्त आहे. या पुस्तकातील बरेचसे लिखाण उद्धव ठाकरे यांना दाखवून झालेले असणार, हे पण प्रत्येकजण जाणतो.

### हे काँग्रेसला मान्य आहे का ?

संजय राऊतांनी जे मांडले आहे ते काँग्रेसला मान्य होणारे आहे का ? काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली, त्यात हा विषय झालाच असेलच. काँग्रेसने याबाबत आपली भूमिका आता स्पष्ट केली पाहिजे. याचे कारण मोदी आणि शाहा यांच्यावर गुजरात दंगलीचे जे आरोप आहेत, (जरी ते त्यातून सुटले असले तरी) ते आरोप आणि ते सिद्ध करण्याची जबाबदारी काँग्रेसच्या सरकारवर होती आणि आज त्यांचाच सहयोगी, मित्रपक्ष सांगतो की मोदी, शाहा यांना आम्हीच सोडवले. शरद पवार यांनी आपले अंग काढून घेण्याची तयारी सुरु केलीच आहे. ‘इंडिया’ आघाडी संपल्याचे त्यांनी जाहीर केल्याने ते काँग्रेसला उत्तर द्यायला बांधील नाहीत. मात्र सोडवले असेल तर त्या दोघांनां का, कोणत्या, कशाच्या मोबदल्यात सोडवले, हे सांगणे आता शरद पवार यांना क्रमप्राप्त आहे. त्यातूनही संजय राऊत यांना तुरुंगात टाकले, तेव्हा त्या दोघांना बाळासाहेबांच्या उपकाराची आठवण आली नाही का? असा सवाल राऊत यांनीं केला आहे. (मोदी,शाहांनी ठाकरे कुटुंबियांपैकी कोणालाच अटक केली नाही. राऊत ठाकरे घराण्यातले नाहीत हे कदाचित विसरले आहेत, असावेत.) मोदी, शाहा यांनी ठाकरे कुटुंबावर कोणते उपकार केले हे जग जाणते आणि ठाकरे यांच्या नोकरांवर, गडीमाणसांवर नरेंद्र मोदी, शाहा का उपकार करतील ? नरकातलं भूत का उरावर घेतील ?

### मनोरंजनाचा नवा उद्योग..

या नव्या पुस्तकाकडे मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. कोणताही पुरावा न देता नुसती फेकाफेक करणे हे संजय राऊत यांचे वागणे, आता नवीन नाही. पाहू, पुस्तक कितपत चालते आणि त्याचा गहजब किती होतो ते !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी ठाकरे गटाची बैठक!

## नाराजी असलेल्या राऊत यांच्यावरच पुन्हा जबाबदारी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विधानसभा निवडणुकीत ज्यांच्याबद्दल नाराजी निर्माण झाली होती, पुन्हा त्याच खासदार संजय राऊत यांच्यावर अहिल्यानगर जिल्ह्यातील महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची जबाबदारी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोपवली आहे. शहरातील जुने कार्यकर्ते त्यामुळे अस्वस्थ झाले आहेत.**



जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पक्षाने खासदार राऊत यांच्यासमवेत माजीमंत्री, आमदार अनिल परब, उपनेते साजन पाचपुते व उपनेते सुहास सामंत यांच्यावरही पक्षाने जबाबदारी टाकली आहे. खासदार राऊत यांच्यासह श्रीगोंद्यातील उपनेते पाचपुते यांच्या भूमिकेविषयी तीव्र नाराजी निर्माण झाली होती. संजय राऊत यांच्याविरोधात त्यावेळी पदाधिकाऱ्यांनी घोषणाबाजीही केली होती. गेल्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटात महाविकास आघाडीतील जागा वाटपावरून, विशेषतः दक्षिण जिल्ह्यातील मतदारसंघात प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यास संजय राऊत जबाबदार असल्याचा आरोप ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यावेळी जाहीरपणे केला होता. मात्र त्याची दखल घेतली गेली नाही. त्यातूनच ठाकरे गट महापालिकेत पर्यायाने शहरात प्रबळ असताना मोठी गळती सुरू झाली ती अद्यापि थांबलेली नाही. केवळ शहरच नाहीतर अहिल्यानगर तालुका, श्रीगोंदा, पारनेर तालुक्यातूनही ठाकरे गटाला अनेक खिंडारे पडली. त्यातूनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्ह्यातील निवडणुकीची जबाबदारी पुन्हा संजय राऊत यांच्यावरच सोपवली गेल्याने शिवसैनिकांत अस्वस्थता आहे. ठाकरे गटाने जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून आमदार सुनील शिंदे यांची पूर्वीच नियुक्ती केलेली आहे. त्यांचा मात्र जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या जबाबदारीत समावेश नसल्याची माहिती मिळाली.

दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर चर्चा करण्यासाठी मुंबईत आज, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यास जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे, रावसाहेब खेवरे व राजेंद्र दळवी, शहरप्रमुख किरण काळे, उपजिल्हा प्रमुख गिरीश जाधव आदी उपस्थित होते. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर की आघाडी करून लढवायची याचा उल्लेख पक्षप्रमुखांकडून करण्यात आला नाही. महापालिका व जिल्हा परिषदेवर भगवा फडकावण्यासाठी तयारीला लागण्याची सूचना पक्षप्रमुखांनी केल्याची माहिती शहरप्रमुख किरण काळे यांनी दिली. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पक्षाने खासदार राऊत यांच्यासमवेत माजीमंत्री, आमदार अनिल परब, उपनेते साजन पाचपुते व उपनेते सुहास सामंत यांच्यावरही पक्षाने जबाबदारी टाकली आहे. खासदार राऊत यांच्यासह श्रीगोंद्यातील उपनेते पाचपुते यांच्या भूमिकेविषयी तीव्र नाराजी निर्माण झाली होती. संजय राऊत यांच्याविरोधात त्यावेळी पदाधिकाऱ्यांनी घोषणाबाजीही केली होती. गेल्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटात महाविकास आघाडीतील जागा वाटपावरून, विशेषतः दक्षिण जिल्ह्यातील मतदारसंघात प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यास संजय राऊत जबाबदार असल्याचा आरोप ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यावेळी जाहीरपणे केला होता. मात्र त्याची दखल घेतली गेली नाही.त्यातूनच ठाकरे गट महापालिकेत पर्यायाने शहरात प्रबळ असताना मोठी गळती सुरू झाली ती अद्यापि थांबलेली नाही.

### पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

केवळ शहरच नाहीतर अहिल्यानगर तालुका, श्रीगोंदा, पारनेर तालुक्यातूनही ठाकरे गटाला अनेक खिंडारे पडली. त्यातूनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्ह्यातील निवडणुकीची जबाबदारी पुन्हा संजय राऊत यांच्यावरच सोपवली गेल्याने शिवसैनिकांत अस्वस्थता आहे. ठाकरे गटाने जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून आमदार सुनील शिंदे यांची पूर्वीच नियुक्ती केलेली आहे. त्यांचा मात्र जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या जबाबदारीत समावेश नसल्याची माहिती मिळाली.दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर चर्चा करण्यासाठी मुंबईत आज, पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

# कुणी म्हणालं मी बालसाहित्य वाचत नाही

## शरद पवारांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना टोला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संजय राऊत यांच्या नरकातला स्वर्ग या पुस्तकाचं प्रकाशन मुंबईत करण्यात आलं. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जावेद अख्तर यांची उपस्थिती होती. तसंच खासदार साकेत गोखले, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांनी पुस्तकाबाबत केलेल्या वक्तव्यावरुन त्यांना टोला लगावला.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माध्यमांनी संजय राऊत यांच्या पुस्तकाबाबत जेव्हा विचारलं तेव्हा ते म्हणाले होते की, "कथा-कादंबऱ्या वाचणं केव्हाच सोडलं आहे. तसंच आता बालवाङ्मय वाचण्याचं माझं वयही राहिलेलं नाही. अशा गोष्टींवर फार गांभीर्याने विचार करण्याची गरज नाही. ते कोण आहेत? मोठे नेते आहेत का?" असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली होती. हाच संदर्भ घेऊन शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांचं नाव न घेता त्यांना टोला लगावला आहे. सत्ताधारी पक्षाच्या लोकांना पुस्तक न वाचता ते कसं काय समजलं माहीत नाही. प्रचंड टीका संजय राऊत आणि पुस्तक याच्यावर सुरु आहे. कुणी म्हणालं मी बालसाहित्य वाचत नाही, कुणी आणखी काय सांगितलं.त्यातून सत्तेचा गैरवापर कसा होतो त्याचं उत्तम लिखाण या पुस्तकाच्या माध्यमातून महाराष्ट्रासमोर आणलं आहे. यंत्रणा कशी वागते याचं लिखाण या पुस्तकात आहे" असंही शरद पवार म्हणाले.संजय राऊत यांना अटक करण्यात आली. त्यांना १०० दिवस त्या ठिकाणी ठेवण्यात आलं. त्यामुळे आमच्यासह अनेकांना आता हे कळेल की तिथली स्थिती काय? ती स्थिती दुरुस्त करण्याचा विचार हा आज किंवा उद्या करावाच लागेल. तुरुंगातल्या आठवणी, अनेकांच्या भेटी गाठी, त्यांचे अनुभव हे लक्षात घ्यावं लागेल. एकनाथ खडसे हे आमचे सहकारी आहेत. त्यांचे जावई इंग्लंडमध्ये होते. टाटा कन्सल्टन्सी या संस्थेत जॉब करत होते. खडसेंच्या संदर्भात काहीतरी तक्रार आली तेव्हा त्यांचे जावई लंडनहून इथे आले, इथे आल्यानंतर ईडीने त्यांना अटक केली. त्यांचा काहीही संबंध नव्हता. अनिल देशमुखांवर एका शासकीय अधिकाऱ्याने जी तक्रार केली होती ती १०० कोटींच्या भ्रष्टाचार केल्याचाहोती. शेवटी न्यायालयात जी केस उभी राहिली तेव्हा १०० मधली दोन शून्य गेली आणि १ कोटींचा भ्रष्टाचार केला असा आरोप त्यांच्यावर झाला.

### देवेंद्र फडणवीस यांना टोला!

. आरोप करणारे जे अधिकारी होते की राज्य सरकारने त्यावेळी भ्रष्टाचाराच्या संदर्भात काही कारवाई केली नव्हती. अशी अनेक नावं आपल्याला सांगता येतील.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माध्यमांनी संजय राऊत यांच्या पुस्तकाबाबत जेव्हा विचारलं तेव्हा ते म्हणाले होते की, "कथा-कादंबऱ्या वाचणं केव्हाच सोडलं आहे. तसंच आता बालवाङ्मय वाचण्याचं माझं वयही राहिलेलं नाही. अशा गोष्टींवर फार गांभीर्याने विचार करण्याची गरज नाही. ते कोण आहेत? मोठे नेते आहेत का?" असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली होती प्रचंड टीका संजय राऊत आणि पुस्तक याच्यावर सुरु आहे. कुणी म्हणालं मी बालसाहित्य वाचत नाही, कुणी आणखी काय सांगितलं.त्यातून सत्तेचा गैरवापर कसा होतो त्याचं उत्तम लिखाण या पुस्तकाच्या माध्यमातून महाराष्ट्रासमोर आणलं आहे. यंत्रणा कशी वागते याचं लिखाण या पुस्तकात आहे.

# यामुळे आपण किती विमाने गमावली?

## खासदार राहुल गांधींची एस. जयशंकर यांच्यावर टीका

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव काही प्रमाणात कमी झाला आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान पूर्णपणे बॅकफूटवर असून भारताकडून जागतिक समूहासमोर दहशतवादाला पाठीशी घालणाऱ्या पाकिस्तानचा चेहरा उघडा पाडण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. यादरम्यान सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात आता राजकारण देखील तापल्याचे पाहायला मिळत आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची एक सोशल मीडिया पोस्ट सध्या चर्चेत आली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर राहुल गांधी यांनी एक पोस्ट केली आहे, ज्यामध्ये त्यांनी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांना लक्ष्य केले आहे.**



राहुल गांधी त्यांच्या पोस्टमध्ये सरकारला काही प्रश्न विचारले आहेत. पोस्टमध्ये राहुल गांधी म्हणाले की, "आपल्या हल्ल्याच्या सुरुवातीला पाकिस्तानला माहिती देणे हा गुन्हा होता. परराष्ट्र मंत्र्यांनी हे जाहीरपणे कबूल केले आहे की भारत सरकारने हे केले. याची कोणी परवानगी दिली? परिणामी आपल्या हवाई दलाने किती विमाने गमावली?" या बरोबर राहुल गांधी यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचा माध्यमांशी संवाद साधतानाचा व्हिडीओ देखील पोस्ट केला आहे. राहुल गांधी यांनी पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये एस. जयशंकर हे भारताच्या पाकिस्तानविरोधातील कारवाईबद्दल बोलताना दिसत आहेत. "ऑपरेशनच्या सुरुवातीला आम्ही पाकिस्तानला संदेश पाठवला होता की आम्ही दहशतवादी तळांना लक्ष्य करत आहोत. आम्ही लष्कराला लक्ष्य करणार नाहीत. त्यामुळे लष्कराकडे या प्रक्रियेत हस्तक्षेप न करण्याचा आणि वेगळे राहण्याचा पर्याय होता, पण त्यांनी हा चांगला सल्ला न स्वीकारण्याचा निर्णय घेतला," असे एस. जयशंकर माध्यमांशी म्हणत आहेत. दरम्यान ७ मे रोजी पहाटे १ ते १.३० दरम्यान भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी स्थळांवर हल्ला केला होता. यानंतर लष्करी कारवायांचे महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी त्यांचे पाकिस्तानी समकक्ष मेजर जनरल काशिफ अब्दुल्ला यांना फोन केला होता, या फोन कॉलच्या संदर्भात एस. जयशंकर माध्यमांना माहिती देत होते.

लेफ्टनंट घई यांनी त्यांच्या समकक्ष पाकिस्तानी अधिकाऱ्यांना सांगितले होते की, भारताने काळजीपूर्वक निवडलेल्या दहशतवादी तळांवर हल्ला केला आणि कोणत्याही लष्करी तळाला लक्ष्य केले नाही. या माध्यमातून पाकिस्तानला संदेश देण्यात आला की जर त्यांना चर्चा करायची असेल तर भारत संवादासाठी तयार आहे. दरम्यान परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात माहिती दिली आहे की, परराष्ट्र मंत्र्यांनी म्हटले होते की आम्ही सुरुवातीलाच पाकिस्तानला इशारा दिला होता, जो की स्पष्टपणे ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यानंतरचा सुरुवातीचा टप्पा आहे. हे (ऑपरेशन सिंदूर) सुरू होण्यापूर्वीचे असल्याचे दाखवले जात आहे. वास्तविकता पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने दाखवली जात असल्याचे दिसून येत आहे. डीजीओएमओ लेफ्टनंट जनरल घई आणि नौदलाचे समकक्ष व्हाइस ॲडमिरल एएन प्रमोद यांच्यासह ११ मे रोजी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत एअर ऑपरेशनचे डीजी एअर मार्शल ए. के. भारती म्हणाले होते की, सध्याच्या संघर्षाच्या स्थितीमुळे ऑफरेशन सिंदूरमध्ये भारताने विमाने गमावली की नाही याबद्दल ते भाष्य करू इच्छित नाहीत. राहुल गांधी त्यांच्या पोस्टमध्ये सरकारला काही प्रश्न विचारले आहेत.

### भारताने किती विमाने गमावली?

पोस्टमध्ये राहुल गांधी म्हणाले की, "आपल्या हल्ल्याच्या सुरुवातीला पाकिस्तानला माहिती देणे हा गुन्हा होता. परराष्ट्र मंत्र्यांनी हे जाहीरपणे कबूल केले आहे की भारत सरकारने हे केले. याची कोणी परवानगी दिली? परिणामी आपल्या हवाई दलाने किती विमाने गमावली?" या बरोबर राहुल गांधी यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचा माध्यमांशी संवाद साधतानाचा व्हिडीओ देखील पोस्ट केला आहे. राहुल गांधी यांनी पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये एस. जयशंकर हे भारताच्या पाकिस्तानविरोधातील कारवाईबद्दल बोलताना दिसत आहेत. "ऑपरेशनच्या सुरुवातीला आम्ही पाकिस्तानला संदेश पाठवला होता की आम्ही दहशतवादी तळांना लक्ष्य करत आहोत.

---

# पाकिस्ताविरोधात ओवेसी यांचे रोखठोक भाष्य

## असदुद्दीन ओवेसी यांनी पुन्हा एकदा पाकिस्तावर सडकून टीका केली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**एआयएमआयएम प्रमुख असदुद्दीन ओवेसी हे गेल्या काही दिवसांपासून चांगलेच चर्चेत आले आहेत. जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जण ठार झाले, यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ला केला.**



दोन्ही देशांमधील वाढलेल्या तणावादरम्यान ओवेसी यांनी वेळोवेळी पाकिस्तानाला प्रत्युत्तर दिलं आहे. आज पुन्हा एकदा किस्तानला सुनावले आहे. याबोरबरच पाकिस्तानमध्ये होत असलेल्या चर्चा आणि सोशल मीडियावर होत असलेल्या ट्रोलिंगवर देखील भाष्य केले आहे. माझं बोलणं ऐकल्याने पाकिस्तानातील लोकांच्या ज्ञानात वाढ होईल असेही ओवेसी यावेळी म्हणाले आहेत. पाकिस्तानात त्यांच्याबद्दल होत असलेल्या चर्चांवर बोलताना ते म्हणाले की, सध्या पाकिस्तानच्या निशाण्यावर मीच आहे. ओवेसी पुढे म्हणाले पाकिस्तानवाल्यांना त्यांच्या इतका स्पष्टवक्ता आणि इतका हँडसम कोणी दिसतच नाहीये. भारताकडून फक्त तेच दिसत आहेत. ते पाकिस्तानबद्दल बोलताना म्हणाले की, "पाहात राहा, तुमच्या डोक्यात जो भुसा भरलेला आहे, तो साफ होईल, तुमच्या ज्ञानात भार पडेल आणि अज्ञान कमी होईल."हैदराबादचे लोकसभा खासदार असदुद्दीन ओवीसी यांनी पाकिस्तान दहशतवादाचा पुरस्कर्ता असल्याचे सांगत कडाडून टीका केली आहे. ते म्हणाले की, पाकिस्तानने त्यांच्या दीर्घकाळच्या इतिहासातून स्पष्ट केले आहे की तो देश मानवतेसाठी धोका आहे. शनिवारी दिलेल्या एका मुलाखतीत ओवेसी म्हणाले की भारताने आता आंतरराष्ट्रीय समुदायासमोर स्पष्ट केले पाहिजे की तो अनेक दशकांपासून पाकिस्तान प्रायोजित दहशतवादाचा बळी ठरत आला आहे संसदेवरील हल्ला, उरी, पठाणकोट आणि नुकतेच पहलगाम येथे पर्यटकांची हत्या इथपर्यंत पाकिस्तानची भूमिका स्पष्ट दिसून येते.

### लोकांच्या ज्ञानात वाढ होईल

पाकिस्तानकडून स्वतःला मुस्लिम देश म्हणून सादर केले जात असल्याबद्दलही ओवेसी यांनी भाष्य केले. ते म्हणाले की भारतात सुमारे २० कोटी मुस्लिम राहतात. पाकिस्तानचा हा दावा देखील चुकीचा आहे, जगाला हे देखील सांगणे आवश्यक आहे. दोन्ही देशांमधील वाढलेल्या तणावादरम्यान ओवेसी यांनी वेळोवेळी पाकिस्तानाला प्रत्युत्तर दिलं आहे. आज पुन्हा एकदा किस्तानला सुनावले आहे. याबोरबरच पाकिस्तानमध्ये होत असलेल्या चर्चा आणि सोशल मीडियावर होत असलेल्या ट्रोलिंगवर देखील भाष्य केले आहे. माझं बोलणं ऐकल्याने पाकिस्तानातील लोकांच्या ज्ञानात वाढ होईल असेही ओवेसी यावेळी म्हणाले आहेत. पाकिस्तानात त्यांच्याबद्दल होत असलेल्या चर्चांवर बोलताना ते म्हणाले .

# ‘एक तिची गोष्ट’ नवी नृत्यनाटिका



प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शिका फुलवा खामकर, त्यांची मुलगी आस्मा, अभिनेता दिग्दर्शक विराजस कुलकर्णी, सूरज पारसनीस आणि ख्यातनाम नाटककार, लेखक मधुसूदन कालेलकर यांची नात गौरी कालेलकर अशी सगळी नामवंत मंडळी ‘एक तिची गोष्ट’ या नव्या नृत्यनाटिकेच्या निमित्ताने एकत्र आले आहेत.ख्यातनाम नाटककार, गीतकार, लेखक, पटकथाकार, नाट्य / चित्रपट निर्माता अशा बहुविध भूमिकेतून रसिकांना अखंड रिझवणारे ज्येष्ठ लेखक कै. मधुसूदन कालेलकर यांचा वारसा समर्थपणे पुढे नेत त्यांच्या नातीने गौरी कालेलकर-चौधरी आणि तिचे पती सिद्धेश चौधरी यांनी ‘मधुसूदन कालेलकर प्रॉडक्शन्स’ या निर्मिती संस्थेची स्थापना केली आहे.

# टॉम क्रूझला भारतीय शैलीतील चित्रपट बनवण्याची इच्छा

सध्या जगभर प्रसिद्ध हॉलीवूड अभिनेता टॉम क्रूझ याच्या ‘मिशन इम्पॉसिबल’ या चित्रपट शृंखलेतील ‘मिशन इम्पॉसिबल – द फायनल रेकनिंग’ या अखेरच्या चित्रपटाची चर्चा आहे. हा चित्रपट पुढच्या आठवड्यात अमेरिकेत प्रदर्शित होणार आहे, मात्र भारतात ६ दिवस आधीच १७ मे रोजी चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने प्रसिद्धीमाध्यमांसमोर आलेल्या टॉम क्रूझने पुन्हा एकदा त्याच्या भारत प्रेमाची कबुली दिली आहे. मला भारतीय चित्रपट, संस्कृती आवडते, असे सांगणाऱ्या या हॉलीवूड अभिनेत्याने भारतात येऊन चित्रपट करायची इच्छा व्यक्त केली आहे. टॉम क्रूझची मुख्य भूमिका असलेला ‘मिशन इम्पॉसिबल’ हा चित्रपट पहिल्यांदा १९९६ साली प्रदर्शित झाला होता. आता २०२५ मध्ये या चित्रपट शृंखलेतील आठवा आणि अखेरचा चित्रपट भारतात प्रदर्शित करण्यात आला आहे. या चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी फिरणाऱ्या टॉम क्रुझ याने प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना त्याच्या भारताविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. मी जेव्हा भारतात आलो होतो तेव्हा तिथे ताजमहाल पाहिला. मुंबईत अनेक ठिकाणी फिरलो, अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या. माझ्या त्या भारतभेटीतला प्रत्येक क्षण मला आजही आठवतो. त्या आठवणी आजही माझ्या मनात रुंजी घालतात. भारत एक अद्भुत देश आहे, इथली संस्कृती खूप कमाल आहे, अशा शब्दांत त्याने भावना व्यक्त केल्या. ‘मैं आप सबसे बहुत प्यार करता हूँ’ असे हिंदीत उच्चारून टॉमने भारतविषयीचे प्रेम व्यक्त केले.

# तुम नज़रें ठीक करो!



प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वत:चा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!

# राधिकाने चित्रपटातील संवाद केले कॉपी!

मुकेश अंबानी व नीता अंबानी यांचे छोटे सुपुत्र अनंत अंबानी यंदा लग्नबंधनात अडकणार आहेत. जुलै महिन्यात राधिका मर्चंटशी अनंत अंबानी लग्नगाठ बांधणार आहेत. त्याआधी नुकताच जामनगरमध्ये दोघांचा मोठ्या थाटामाटात प्री-वेडिंग सोहळा पार पडला. १ मार्च ते ३ मार्च असा तीन दिवसांच्या या सोहळ्याला देश-विदेशातून दिग्गज मंडळी उपस्थित राहिली होती. अनंत-राधिकाच्या प्री-वेडिंग सोहळ्याची चर्चा देशासह जगभरात अजूनही सुरू आहे. फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. अशातच प्री-वेडिंग सोहळ्यात मुकेश अंबानींच्या धाकट्या सूनेने दिलेल्या भाषणात हॉलीवूड चित्रपटातील संवाद कॉपी केल्याचं समोर आलं आहे. यासंबंधित व्हिडीओ सोशल मीडियावर खूपच चर्चेत आला आहे.अनंत अंबानींची होणारी पत्नी राधिका मर्चंट हिने अंबानी कुटुंबासाठी एका भाषणातून भावना व्यक्त केल्या होत्या. मुकेश अंबानींपासून ते श्लोका मेहतापर्यंत अंबानी कुटुंबातील प्रत्येक सदस्याविषयी राधिका बोलली होती. यावेळी तिने होणारे पती अनंत यांच्यासाठी हृदयस्पर्शी भाष्य केलं. जे ऐकून नेटकऱ्यांना एका हॉलीवूड चित्रपटाची आठवण झाली. राधिकाचा हा व्हिडीओ ‘सादिक सलीम’ या इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये २००४ साली प्रदर्शित झालेल्या SHALL WE DANCE? या चित्रपटातील संवाद अंबानींच्या होणाऱ्या सूनेने आपल्या भाषणात कॉपी केले आहेत. या चित्रपटात अभिनेत्री सुसान सरंडन हे संवाद म्हणताना दिसत आहेत. तिचे हेच संवाद शब्दशः राधिका बोलताना पाहायला मिळत आहे. ‘विटनेस टु योर लाइफ’ असं या संवादाचे नाव आहे. राधिकाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी राधिकाला ट्रोल केलं आहे. तर काही नेटकऱ्यांनी तिचं समर्थन केलं आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, ‘चॅटजीपीटीने सुद्धा चांगले संवाद लिहून देण्याच काम केलं असतं.’ तसंच दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, ‘एवढा पैसा खर्च केला. तर एखाद्या संवाद लेखकाला कामासाठी घेऊ शकला असता.’ तर तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, ‘आता हिला आरामात चित्रपटाच्या ऑफर मिळतील.’ अशा अनेक प्रतिक्रिया या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.दरम्यान, अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, १ मार्चला जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाचा परफॉर्मन्स झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संगीत सोहळा झाला. यामध्ये बॉलीवूडच्या सेलिब्रिटींनी जबरदस्त परफॉर्मन्स केला. तिसऱ्या दिवशी, ३ मार्चला ‘टस्कर ट्रेल्स’ आणि ‘हस्ताक्षर’ कार्यक्रम झाला. ‘टस्कर ट्रेल्स’ हा आउटडोअर कार्यक्रम होता.

# भाग्यश्रीने काढले माधुरी दीक्षितचे स्केच



माधुरी दीक्षितने नुकताच तिचा ५८ वा वाढदिवस साजरा केला. तिच्या वाढदिवसाला चाहत्यांसह अनेक कलाकारांनी शुभेच्छा दिल्या. या सगळ्यात लोकप्रिय अभिनेत्री भाग्यश्रीने माधुरीला हटके पद्धतीने शुभेच्छा दिल्याचे पाहायला मिळाले. भाग्यश्री व माधुरी दीक्षित यांच्यात आजही मैत्री टिकून असल्याचे दिसते. भाग्यश्रीने माधुरी दीक्षितला शुभेच्छा देताना अभिनेत्रीचे काही फोटो शेअर केले आहेत. यामध्ये तिने १९९८ साली माधुरीचे स्केच काढले होते. ते देखील शेअर केले आहे.हे फोटो शेअर करताना भाग्यश्रीने लिहिले की मिलियन डॉलर हसू असलेली माधुरी, तुला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा. एक स्केच आहे जे मी खूप आधी (१९८८) काढले होते. मला माहित होते की आपण एके दिवशी मैत्रीणी असू. तुला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा.” यावर माधुरीने कमेंट करत भाग्यश्रीचे आभार मानले आहेत. माधुरीसह अनेक चाहत्यांनी कमेंट करीत भाग्यश्रीने काढलेल्या या स्केचचे कौतुक केले आहे. एका नेटकऱ्याने लिहिले, “सुंदर स्केच”, दुसऱ्या एका नेटकऱ्याने लिहिले, “हे स्केच खूप छान आहे. तुम्ही स्केचसाठी आणखी वेळ काढला पाहिजे”, आणखी एका नेटकऱ्याने लिहिले, “तू खरी कलाकार आहेस. अभिनय, स्वयंपाक आणि स्केच, सर्व काही उत्तम करतेस”, एका नेटकऱ्याने लिहिले, “तुझी ही कला माहित नव्हती. स्केच खरंच खूप सुंदर आहे.”“मला हे स्केच खूप आवडले”, “तुम्ही काढलेले आणखी स्केच पाहायला आवडतील”, अशा कमेंट करीत चाहत्यांनी भाग्यश्रीला कौतुक केले. तसचे माधुरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. माधुरीने ‘दिल’ चित्रपटात साकारलेल्या भूमिकेचे भाग्यश्रीने स्केच काढल्याचे दिसत आहेत. तसेच भाग्यश्रीने माधुरीबरोबर काही सुंदर फोटो शेअर केले आहेत. ज्यामध्ये दोघीही अत्यंत सुंदर दिसत आहेत.माधुरी व भाग्यश्री यांच्याबद्दल बोलायचे तर दोघीही बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहेत. १९८०-९० च्या दशकात दोघीही काम करत होत्या. भाग्यश्रीने ‘मैंने प्यार किया’ या चित्रपटात सलमान खानबरोबर प्रमुख भूमिकेत काम केले होते. तिची चित्रपटातील ही भूमिका चांगलीच गाजली. तिला मोठी लोकप्रियता मिळाली. मात्र, त्यानंतर अभिनेत्रीने तिच्या कुटुंबावर लक्ष केंद्रित करण्यासाठी चित्रपटातून ब्रेक घेतला. मात्र, माधुरी दीक्षितने बराच काळ बॉलीवूडमध्ये काम केले.माधुरी दीक्षितचे अनेक चित्रपट मोठे गाजले. त्यामध्ये ‘हम आपके है कौन’, ‘कोयला’ असे अनेक चित्रपट आहेत. त्यानंतर तिने डॉक्टर श्रीराम नेनेंबरोबर लग्नगाठ बांधली व ती अमेरिकेला वास्तव्यास गेली. माधुरी दीक्षित नुकतीच भूल भुलैय्या ३ मध्ये दिसली होती. आता आगामी काळात ती कोणत्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# विराटला इंग्लंडमध्ये खेळण्याची ऑफर?

## निवृत्तीनंतर समोर आली मोठी माहिती; कोणी दिला प्रस्ताव?

। नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विराट कोहलीने हल्लीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. विराटने १२ मे रोजी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत निवृत्तीची घोषणा केली. आगामी इंग्लंड दौऱ्यापूर्वी विराट कोहलीने निवृत्ती घेतल्याने सर्वांनाच धक्का बसला. विराटने त्याचा सर्वात आवडता क्रिकेट फॉरमॅट कसोटी क्रिकेटमध्ये चांगलं यश मिळवलं होतं. पण यादरम्यान विराटला इंग्लंडमधील एका संघाकडून क्रिकेट खेळण्याची ऑफर देण्यात आली आहे.**



विराट कोहलीने कसोटीतून निवृत्ती घेण्यापूर्वी ५ दिवस आधी कर्णधार रोहित शर्मानेही कसोटीला अलविदा केलं. जूनमध्ये होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यावर भारतीय संघ दोन अनुभवी आणि सिनियर खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहलीशिवाय दिसणार आहे. त्यामुळे टीम इंडियासाठी हा दौरा मोठं आव्हान असणार आहे.विराट कोहलीच्या निवृत्तीदरम्यान त्याला इंग्लंडमध्ये खेळण्याची ऑफर मिळाली आहे. मिडलसेक्स या काऊंटी संघाला विराट कोहलीने त्यांचे प्रतिनिधित्व करावे असे वाटते. द गार्डियनने वृत्त दिले आहे की कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली, परंतु प्रथम श्रेणी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याबाबत काहीही सांगितलेलं नाही. त्यात असंही म्हटले आहे की कोहली "काऊंटी चॅम्पियनशिप किंवा वन-डे कप" खेळू शकतो. मिडलसेक्सचे क्रिकेट संचालक ॲलन कोलमन म्हणाले, "विराट कोहली हा त्याच्या पिढीतील सर्वात प्रतिष्ठित खेळाडू आहे. त्यामुळे अर्थातच आम्हाला तो आमच्या संघाकडून खेळेल का याबद्दल चर्चा करण्यात रस आहे."मिडलसेक्सने भूतकाळात मोठ्या खेळाडूंना आकर्षित केले आहे, कारण त्यांचे घरचे मैदान लॉर्ड्स क्रिकेट मैदान आहे. २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिकेचा एबी डिव्हिलियर्स टी२० ब्लास्टमध्ये खेळला होता. लंडन स्पिरिटने द हंड्रेडच्या दुसऱ्या टप्प्यासाठी न्यूझीलंडच्या केन विल्यमसनला संघात सामील केले आहे.डिव्हिलियर्स आणि विल्यमसनबरोबरचे दोन्ही करार एमसीसी (मेरीलेबोन क्रिकेट क्लब) च्या सहकार्याने करण्यात आले. याचा अर्थ त्यांना स्टार खेळाडूंना करारबद्ध करण्याचा अनुभव आहे. आता अधिकाऱ्यांनी असेही संकेत दिले आहेत की ते विराट कोहलीसाठीही असाच करार करू इच्छितात. मिडलसेक्स संघाला आशा आहे की कोहलीला 'क्रिकेटची पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉर्ड्समध्ये पुन्हा खेळण्याचा आनंद मिळेल आणि त्याला सहभागी करून घेण्यात ते उत्सुक आहेत. जर विराट कोहली खरोखरच इंग्लंडमध्ये रेड-बॉल क्रिकेट खेळत असेल, तर हंगामाच्या अखेरीस तो लँकेशायरच्या जेम्स अँडरसनविरुद्ध खेळताना दिसण्याची शक्यता आहे.विराट कोहलीने कसोटीतून निवृत्ती घेण्यापूर्वी ५ दिवस आधी कर्णधार रोहित शर्मानेही कसोटीला अलविदा केलं. जूनमध्ये होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यावर भारतीय संघ दोन अनुभवी आणि सिनियर खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहलीशिवाय दिसणार आहे. त्यामुळे टीम इंडियासाठी हा दौरा मोठं आव्हान असणार आहे.विराट कोहलीच्या निवृत्तीदरम्यान त्याला इंग्लंडमध्ये खेळण्याची ऑफर मिळाली आहे. मिडलसेक्स या काऊंटी संघाला विराट कोहलीने त्यांचे प्रतिनिधित्व करावे असे वाटते. द गार्डियनने वृत्त दिले आहे की कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली, परंतु प्रथम श्रेणी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याबाबत काहीही सांगितलेलं नाही. त्यात असंही म्हटले आहे की कोहली "काऊंटी चॅम्पियनशिप किंवा वन-डे कप" खेळू शकतो. मिडलसेक्सचे क्रिकेट संचालक ॲलन कोलमन म्हणाले.

### लॉर्ड्समध्ये पुन्हा खेळण्याचा आनंद

"विराट कोहली हा त्याच्या पिढीतील सर्वात प्रतिष्ठित खेळाडू आहे. त्यामुळे अर्थातच आम्हाला तो आमच्या संघाकडून खेळेल का याबद्दल चर्चा करण्यात रस आहे." मिडलसेक्सने भूतकाळात मोठ्या खेळाडूंना आकर्षित केले आहे, कारण त्यांचे घरचे मैदान लॉर्ड्स क्रिकेट मैदान आहे. २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिकेचा एबी डिव्हिलियर्स टी२० ब्लास्टमध्ये खेळला होता. लंडन स्पिरिटने द हंड्रेडच्या दुसऱ्या टप्प्यासाठी न्यूझीलंडच्या केन विल्यमसनला संघात सामील केले आहे.डिव्हिलियर्स आणि विल्यमसनबरोबरचे दोन्ही करार एमसीसी (मेरीलेबोन क्रिकेट क्लब) च्या सहकार्याने करण्यात आले. याचा अर्थ त्यांना स्टार खेळाडूंना करारबद्ध करण्याचा अनुभव आहे. आता अधिकाऱ्यांनी असेही संकेत दिले आहेत की ते विराट कोहलीसाठीही असाच करार करू इच्छितात. मिडलसेक्स संघाला आशा आहे की कोहलीला 'क्रिकेटची पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉर्ड्समध्ये पुन्हा खेळण्याचा आनंद मिळेल आणि त्याला सहभागी करून घेण्यात ते उत्सुक आहेत.

# आरसीबीला सामना रद्द झाल्याचा बसला धक्का

## पहिल्या स्थानी असूनही टॉप-4 मधून होऊ शकते बाहेर

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ ला १७ मे पासून म्हणजेच आज स्थगितीनंतर पुन्हा सुरुवात झाली. पहिलाच सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स या संघांमध्ये खेळवला जाणार होता. पण पावसामुळे बंगळुरूमध्ये होणारा हा सामना पावसामुळे नाणेफेकीशिवाय रद्द करण्यात आला. त्यामुळे आता दोन्ही संघांना १-१ गुण देण्यात आला आहे. यानंतर प्लेऑफचं समीकरण कसं बदललं आहे, जाणून घेऊया.**






आरसीबी वि. केकेआर सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना १-१ गुण देण्यात आला. यासह केकेआरचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर होणारा चौथा संघ ठरला आहे. तर दुसरीकडे आरसीबीचा संघ १२ सामन्यांत सर्वाधिक १७ गुणांसह पहिल्या स्थानी पोहोचला आहे. पण संघ अद्याप प्लेऑफसाठी पात्र ठरलेला नाही. त्यामुळे आरसीबी संघ अजूनही टेन्शनमध्ये आहे.१२ सामन्यांत १७ गुणांसह जरी आरसीबीने अव्वल स्थानावर झेप घेतली असली तरी संघाला प्लेऑफसाठी पात्रता निश्चित करता आलेली नाही. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ १७ गुणांसह अव्वल स्थानावर पोहोचला असला तरी, त्याचा प्लेऑफमधील प्रवेश अद्याप निश्चित झालेला नाही. गुजरात टायटन्स सध्या ११ सामन्यांनंतर १६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर असल्याने त्यांना सध्या बाद होण्याचा धोका आहे. तर मुंबई इंडियन्स १२ सामन्यांनंतर १४ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

### प्लेऑफसाठी काय करावं लागेल?

आता टॉप चारमध्ये प्रवेश निश्चित करण्यासाठी उर्वरित दोन सामन्यांपैकी एक तरी सामना जिंकणं महत्त्वाचं आहे. पंजाब किंग्ज किंवा दिल्ली कॅपिटल्स या संघांपैकी एका संघाने जरी सामना गमावला तर आरसीबी प्लेऑफसाठी पात्र ठरेल. याशिवाय आरसीबीला जर टॉप-२ मध्ये राहायचं असेल तर संघाला दोन्ही सामने जिंकावे लागतील.

जर या दोन्ही संघांना लीग टप्प्यात १८-१८ गुण मिळाले आणि दुसरीकडे पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांनी १७ गुण मिळवले तर आरसीबीला प्लेऑफमध्ये पोहोचणं कठीण होईल.पंजाब संघाने ११ सामन्यांनंतर १५ गुण मिळवले आहेत. तर दिल्ली संघाचे ११ सामन्यांत १३ गुण आहेत. याचा अर्थ असा की या दोघांसाठी आरसीबीच्या १७ गुणांची बरोबरी करणं कठीण काम असणार नाही. त्यामुळे, तिन्ही संघांचे १७-१७ गुण असतील आणि नेट रन रेट महत्त्वाची भूमिका बजावेल.सध्या, बंगळुरू (+०.४८२) चा नेट रन रेट पंजाब (+०.३७६) आणि दिल्ली (+०.३६२) पेक्षा चांगला आहे. पण तिघांमध्ये फारसा फरक नाही. SRH आणि LSG विरुद्ध पराभव झाल्यानंतर बंगळुरू संघ खाली येऊ शकतो. जर असं झालं तर आरसीबी प्लेऑफमधून बाहेर पडेल.

# महाईन्यूज

ePaper

। रविवार ।
। दि. 18 मे 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
प्रज्वलितो ज्ञानमयः प्रदीपः
“यत् भावो – तत् भवति”
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> ‘C’ Language
> Basic Java
> Basic Tally
From
26th May 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


MASTER MIND GLOBAL SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is Creativity, There is Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7 STAR RANKING
A++ Grade
In Leadership & Quality Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com